ePaper
| वर्ष - 8 । अंक - 208 | UDYAM-MH-26-0158827 |

## EVM मधून कुठलाही डेटा डिलीट करू नका; सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला निर्देश



महाईन्यूज ™

### आतील पानांत वाचा

- पुण्यातील फुले वाडा-स्मारकाच्या विस्ताराला मान्यता
- "ज्या रंगाचा चष्मा तसे जग" : ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांची टीका
- कप्तान चला सीना तान! मुंबईसाठी ठरला संकटमोचक

www.mahaenews.com | बुधवार, दि. 11 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## परिक्षांमध्ये 'कॉपी'बहाद्दरांना आता अद्दल घडणार!

# राज्यातील परीक्षा होणार आता 'पारदर्शी'

### राज्य सरकारचा मोठा निर्णय : कॉपी प्रकरणात संबंधित केंद्राची मान्यता होणार रद्द

। मुंबई ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**राज्यातील दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना दिले आहेत. अशा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करावी तसेच कॉपीस मदत करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्याचे निर्देश त्यांनी दिले.**



राज्यातील 12 वी बोर्ड परीक्षेला आजपासून सुरुवात झाली असून कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठी शासन व प्रशासनाने यंदा कडक अंमलबजावणी केल्याचं दिसून येत आहे. परीक्षा केंद्राबाहेर पोलिसांचा बंदोबस्त असून परीक्षा केंद्रावरही केंद्रप्रमुखांना कॉपीमुक्त परीक्षांसाठी सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, राज्यातील विविध केंद्रावर भरारी पथके धाड टाकून परीक्षेतील विद्यार्थ्यांची तपासणी करत आहेत. विद्यार्थ्यांकडून कॉपी केली जात आहे, कुठे गोंधळ आहे का, याचा तपास केला जात आहे.

विशेष म्हणजे बुलढाणा जिल्ह्यात चक्क शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी परीक्षा केंद्रावर धडक दिल्याने केंद्रप्रमुख व परिसरात खळबळ उडाल्याचं पाहायला मिळालं. मंत्री पंकज भोयर यांनी येथील एका परीक्षा केंद्रावर जाऊन वर्गात पेपर सोडवत असलेल्या विद्यार्थ्यांची पाहणी केली. तसेच, वर्गावर उपस्थित सुपरवायजर यांच्याशी देखील संवाद साधला.

### राज्यात 15 लाख 5 हजार 37 विद्यार्थी

राज्यातील 9 विभागांत 11 फेब्रुवारी ते 18 मार्च 2015 कालावधीत होणार बारावीची परीक्षा होत आहे. आजपासून या परीक्षेला सुरुवात झाली असून पहिलाच पेपर इंग्रजीचा आहे. यंदाच्या वर्षी परीक्षेत एकूण 15 लाख 5 हजार 37 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये 8 लाख 10 हजार 348 मुले, तर 6 लाख 94 हजार 652 मुली आहेत. यंदा 37 तृतीयपंथी नागरिकही परीक्षेसाठी बसले आहेत. राज्यात एकूण 10 हजार 550 कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी 3 हजार 373 मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये कल्पकतेला नाविन्यतेची जोड!

### आर्ट टू वेस्ट : महापालिका आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचा अनोखा प्रयोग

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**मोकळ्या जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे. या कर्मचाऱ्यांनी चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथील सार्वजनिक जागेवर खराब झालेले झाडू, बांबूच्या काठ्या तसेच इतर टाकाऊ वस्तूंचा अतिशय कल्पकतेने वापर करून सुंदर कलाकृती उभारली आहे. 'आर्ट टू वेस्ट' ही संकल्पना राबवल्यामुळे हा परिसर कचरामुक्त झाला आहे. शिवाय याठिकाणी आता सेल्फी काढण्याचा आनंदही नागरिक घेऊ लागले आहेत.**



कल्पकतेला नाविन्यतेची जोड देऊन एखादी सार्वजनिक जागा कचरामुक्त करून अधिक सुंदर बनवण्याची कमाल महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी करून दाखवली आहे. चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथे असणाऱ्या मोकळ्या जागेवर परिसरातील नागरिकांकडून कचरा टाकला जात होता. येथे कचरा टाकू नये, असे वारंवार आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात येत होते.

परंतु त्यानंतरही कचरा टाकण्याचा प्रकार सुरू असल्याने हा परिसर अस्वच्छ झाला होता. अखेर येथील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे.

आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी स्वच्छता करून खराब झाडू, बांबूच्या काठ्या, इतर टाकाऊ वस्तू यांचा कल्पकतेने वापर करून सुंदर व सुबक कलाकृती तयार केली. त्यामुळे येथील कचऱ्याची समस्या दूर तर झाली आहेच, शिवाय येथील स्थानिक नागरिक ही जागा स्वच्छ राहील, यासाठी काळजी घेऊ लागले आहेत. ही जागा कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होऊ लागले आहे. ही जागा कचरामुक्त करून तेथे टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती तयार करून उभारण्यासाठी महापालिका 'अ' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

> कचरा मुक्त पिंपरी चिंचवड शहरासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. चिंचवड परिसरात आरोग्य कर्मचाऱ्यांनी राबविलेली 'आर्ट टू वेस्ट' ही संकल्पना कौतुकास्पद आहे. अशा अभिनव संकल्पना राबविण्याचा प्रयोग आरोग्य विभागाकडून सातत्याने केला जात असतो. नागरिकांनीही पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे.
>
> - सचिन पवार, उप आयुक्त, आरोग्य विभाग, महानगरपालिका.

### महानगरपालिका स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी

# फुले वाडा-स्मारकाच्या विस्ताराला मान्यता

## जागा मालकांना नुकसान भरपाई देणार : सुमारे 40 कोटी रुपयांची निधी गरज

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी आरक्षित जागेचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास स्थायी समितीच्या बैठकीत नुकतीच मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामध्ये जागा जाणाऱ्या मालकांना नुकसानभरपाई दिली जाणार आहे. भूसंपादनासाठी ४० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.**

गेल्या आठवड्यात महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी नगरविकास मंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. या भागातील जागा ताब्यात घेऊन तेथे स्मारक उभारले जाणार आहे. यासाठी आजूबाजूची जागा ताब्यात घेऊन आरक्षित केली जाणार आहे. राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात याबाबत तरतूद केली जाणार आहे. या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेल्या जागेचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सूचना महापालिकेला करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेने या भागातील जागा ताब्यात घेत ही जागा आरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यामध्ये एकूण ९१ मिळकती ताब्यात घेण्यात येणर असून, ५ हजार ३१० चौरस मीटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. यामध्ये ५१६ मालकांची संख्या असून भाडेकरूंची संख्या २८५ इतकी आहे. यासाठी ४० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता लागणार आहे. महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबााई फुले स्मारकांच्या विस्तारीकरणासाठी येथील जागेचे भूसंपादन करून रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

त्यानंतर फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारक या दोन्ही स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दोन्ही स्मारकांचे जतन आणि विकास करण्यात येणार आहे. यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारने मान्य केला असून, प्रशासकीय मान्यतेनंतर हा मंजूर निधी महापालिकेला वितरीत केला जाणार आहे.



**दोन्ही स्मारकांचे जतन आणि विकास**

स्मारकांच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येणार असून त्यानंतर फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारक या दोन्ही स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दोन्ही स्मारकांचे जतन आणि विकास करण्यात येणार आहे.

### वाहनधारकांनो, ...अन्यथा कारवाई, 31 मार्चपर्यंत मुदत

## आरटीओचे फर्मान: वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावणे बंधनकारक

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**अत्याधुनिक हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) आता जुन्या वाहनांनाही बसवावी लागणार असून, यासाठी ३१ मार्चची मुदत दिली आहे. सध्या नव्या वाहनांना ती उपलब्ध होते. मात्र, जुन्या वाहनधारकांनी लवकर अशा प्रकारची नंबरप्लेट बसवून घेण्याचे आवाहन ३१ मार्चची मुदत दिली केले आहे.**

देशभरातील वाहन उत्पादक कंपन्यांना १ एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट देणे बंधनकारक केले होते. नव्याने वाहन खरेदी केल्यानंतर या नंबरप्लेट उपलब्ध होतात. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार केल्या आहेत. ही प्लेट होलोग्राम स्टिकरसह येते. त्यावर इंजिन आणि चेसिस क्रमांक लिहिलेला असतो आणि हा नंबर प्रेशर मशिनद्वारे लिहिला जातो. हाय सिक्युरिटी नंबर प्लेटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ती एकदा तुटली की पुन्हा जोडता येत नाही.




यासोबतच ही प्लेट अगदी वेगळ्या पद्धतीने बनवली जाते. कोणीही त्याची कॉपी करून बनावट प्लेट बनवू शकत नाही. त्याची चोरी व गैरवापर करता येत नाही. एखाद्या वाहनाला अपघात झाला तर गाडीला लावलेली हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या मालकासह सर्व माहिती देते.

**...तर कारवाई टाळेल**

जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले असून, त्यासाठी ३१ मार्चची मुदत आहे. या मुदतीनंतर संबंधित विभागाकडून कारवाई होणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मात्र, या निर्णयाची जनजागृती गरजेची आहे. जेणेकरून नागरिकांना पुरेसा कालावधी मिळून भविष्यातील कारवाई टळू शकेल.

**सर्व वाहनांना एचएसआरपी बंधनकारक**

एप्रिल २०१९ नंतर बाजारात येणाऱ्या सर्व वाहनांना ती अनिवार्य आहे. तसेच आता २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी बंधनकारक करण्यात आले आहे. काही महिन्यांपूर्वीच हा निर्णय झाला असून, त्यासाठी ३१ मार्चची मुदत देण्यात आली आहे. त्यासाठी राज्यभरात तीन खासगी एजन्सींची नेमणूक करण्यात आली आहे. नागरिकांना ऑनलाइन प्रक्रिया करून तसेच आपल्या शहरातील असलेल्या अधिकृत केंद्रामध्ये ती बसवून घेता येणार आहे.

### शहरात 69 हजार मालमत्तांचा भरणा अद्याप प्रलंबित

# मिळकतकर थकीत मालमत्तांचा ‘लिलाव’

## 757 मालमत्तांची जप्ती: महानगरपालिका कर संकलन विभागाची आक्रमक भूमिका

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून पिंपरी - चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांना थकीत कराचा भरणा करण्याचे आवाहन विविध माध्यमातून वारंवार करण्यात येत आहे. त्याबरोबरच, शहरातील थकबाकीदारांच्या यादीमध्ये असणाऱ्या शाळा, हॉटेल, हॉस्पिटल, कारखाने, मॉल यासारख्या व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुध्दा करण्यात येत असून आत्तापर्यंत जवळपास ७५७ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून ज्यांनी जप्त मालमत्तेचा थकीत कर आज अखेर महानगरपालिकेकडे जमा केलेला नाही अशा जप्त मालमत्तांवर लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.**



> नियमितपणे कराचा भरणा करणाऱ्या करदात्यांना प्रोत्साहनपर २ टक्क्यांची सवलत...
> सलग ३ वर्षे नियमितपणे कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना चौथ्या वर्षीच्या मालमत्ताकरामध्ये सवलतीव्यतिरिक्त अधिकच्या २ टक्क्यांची प्रोत्साहनपर सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे नियमित कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांनी चालू वर्षी अद्यापही कराचा भरणा केला नसेल तर अशा मालमत्ताधारकांना सलग तीन वर्षे नियमित कर भरल्यानंतर चौथ्या वर्षीच्या मालमत्ताकरावर देण्यात येणारी २ टक्क्यांची सवलत मिळणार नाही. त्यामुळे जे मालमत्ताधारक आपल्या कराचा नियमितपणे भरणा करतात अशा मालमत्ताधारकांनी कर भरण्यामध्ये खंड न पाडता आपल्या थकीत कराचा भरणा केला तर ते २ टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार आहेत.
>
> - **अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.

याबाबत लवकरच लिलावाची जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. सबब, ज्या मालमत्ताधारकांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे अशा मालमत्ता धारकांनी दि. २५/०२/२०२५ पुर्वी संपुर्ण कराची थकबाकी महानगरपालिकेकडे जमा करावी. सबब, करसंकलन विभागाकडून ज्यांचा कर थकीत आहे अशा मालमत्तांवर जप्तीची कारवाई व जे मालमत्ताधारक नियमित कराचा भरणा करतात अशा मालमत्ताधारकांना मालमत्ताकरावर सवलत सुध्दा देत आहे. यामध्ये जे नागरिक नियमितपणे सलग ३ वर्षे कराचा भरणा करित आहेत अशा करदात्यांस चौथ्या वर्षी मालमत्ता करामध्ये अतिरिक्त २ टक्क्यांची सवलत देण्यात येते. चालू वर्षामध्ये अशा काही नियमितपणे कर भरणाऱ्या काही करदात्यांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही. त्यामुळे अशा नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरणामध्ये खंड न पाडता थकीत मालमत्ताकर भरुन नियमित १० टक्के सवलतीबरोबरच अधिकच्या २ टक्क्यांच्या सवलतीसाठी पात्र ठरण्यासाठी चालू वर्षाचा मालमत्ताकर बिलाची रक्कम त्वरित भरुन लाभ घ्यावा. असे आवाहन करसंकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये ४ लाख ८६ हजार ९६१ इतक्या मालमत्ताधारकांनी आत्तापर्यंत ७३० कोटींच्या कराचा भरणा केला आहे. तथापी सुमारे ३ लाख २१ हजार इतक्या मालमत्ताधारकांनी ३३५ कोटी इतकी रक्कम २०२३-२४ या वर्षात जमा केली. मात्र, यातील ६९ हजार मालमत्ताधारकांनी चालूवर्षी कराचा भरणा अद्यापही महानगरपालिकेकडे केलेला नाही. सबब, या मालमत्ताधारकांनी चालूवर्षी कराचा भरणा न केल्यास त्यांस अतिरिक्त २ टक्क्यांची सवलतीस ते पात्र ठरणार नाहीत. ज्या नागरिकांनी नियमितपणे कराचा भरणा केला आहे अशा नागरिकांनी चालूवर्षी खंड न पाडता कराचा भरणा करुन सवलतीचा लाभ घ्यावा असे करसंकलन विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

---

### प्रधानमंत्री आवास योजना किवळेतील लाभार्थींना दिलासा

## महापालिका आयुक्तांचे आवाहन: येत्या 15 मार्चपर्यंत संमतीपत्र सादर करा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रावेत प्रकल्पातील ९३४ सदनिकांकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ऑनलाईन पद्धतीने सोडत काढली होती. परंतु महानगरपालिकेकडून रावेत येथील प्रकल्प रद्द करण्यात आला होता.**




### प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य...

किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या ७५५ सदनिका महानगरपालिकेकडे उपलब्ध होणार आहेत. या सदनिका आता रद्द झालेल्या रावेत प्रकल्पातील पात्र लाभार्थ्यांना देण्याचे नियोजन असून एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये इतकी आहे. ज्या लाभार्थ्यांना या दरामध्ये लाभ घ्यावयाचा आहे, त्यांनी संमतीपत्र सादर केल्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार वितरण करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

मात्र आता रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या किवळे येथील सदनिका देण्याचे नियोजन आहे. या एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये असून या दरामध्ये ज्या लाभार्थ्यांना लाभ घ्यावयचा आहे, त्या लाभार्थ्यांनी संमतीपत्र महानगरपालिकेकडे १५ मार्च २०२५ पर्यंत सादर करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिका उभारण्यात येत आहेत. या सदनिका आता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. या ७५५ सदनिकांपैकी ३७८ सदनिका सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना, २२६ सदनिका इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ९८ सदनिका अनुसुचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ५३ सदनिका अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. एकूण ७५५ सदनिकांपैकी ३८ सदनिका या दिव्यांग लाभार्थ्यांसाठी राखीव असणार आहेत.

रावेत प्रकल्पातील लाभार्थी हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या धोरणानुसार संमतीपत्र देऊन या सदनिकांचा लाभ घेऊ शकतात. लाभार्थ्यांनी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडे संमतीपत्र सादर करावे. या संमतीपत्राचा मसुदा लाभार्थ्यांनी चिंचवडगांव येथील चाफेकर चौकात असणाऱ्या उप आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाच्या कार्यालयातून घ्यावा, व आवश्यक माहिती भरून सादर करावा. लाभार्थ्यांना सदनिकांचा लाभ घेताना संमतीपत्रासोबत आवश्यक कागदपत्रेही सादर करावी लागणार आहेत. त्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निकष पुर्तता करणाऱ्या अर्जदारांनाच किवळे प्रकल्पातील सदनिका वाटप करण्यात येणार आहेत. याशिवाय सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रियेमध्ये बदल करणे, या प्रक्रियेला स्थगिती देणे अथवा रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवले आहेत.




**महाराष्ट्रात सध्या सत्तेवर जरी फडणवीस सरकार असले आणि राज्याचे मुख्यमंत्रीपद देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असले तरी लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसले आहेत ते लोकप्रिय नेते, कर्तव्यतत्पर एकनाथ शिंदे !**

# गोरगरिबांना मदतीचा हात, सर्वसामान्यांना नेहमी साथ.. कर्तव्यदक्ष नेता एकनाथ !



अनपेक्षिपणे मिळालेल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात एकनाथ शिंदे यांनी जी लोकोपयोगी कामे केली, त्याला महाराष्ट्रातील जनतेने साथ तर दिली आहेत, पण अजूनही जनता एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी असल्याचे चित्र वेळोवेळी दिसून येत आहे.

### ‘त्या’ ऐतिहासिक फलकाची चर्चा

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या काळात घेतलेले अनेक निर्णय फिरवण्याचा सपाटा सध्याच्या फडणवीस सरकारने लावला आहे. अर्थात्, सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे काम पाहत असले तरी अनेक निर्णय फिरवण्यात आले आहेत. या प्रसंगाच्या विरोधात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसमोर लावण्यात आलेल्या मोठ्या फलकाची चर्चा मात्र जोरात सुरू झाली आहे. एकनाथ शिंदे यांनी घेतलेले निर्णय अचूक होते, याचेच ते द्योतक आहे. एकनाथ शिंदे यांचे निर्णय घेऊ नका असा इशारा या फलकाद्वारे देवेंद्र फडणवीस यांना जणू देण्यात आला आहे. लोकप्रियतेचे शिखर म्हणजे दुसरे काय असते?

### घटना शिरीष महाराज मोरे यांची!

दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे श्री संत तुकाराम महाराजांच्या वंशातील शिरीष महाराज मोरे यांनी अत्यंत दुर्दैवीपणाने आत्महत्या केली. त्याला कारणीभूत ते त्यांच्यावर असलेले 32 लाखाचे कर्ज ! शिरीष महाराजांची लोकप्रियता, प्रवचनांमध्ये त्यांची असलेली हातोटी आणि महाराष्ट्रात दूरवर पोहोचलेले त्यांचे कीर्तन.. याची योग्य दखल एकनाथ शिंदे यांनी घेतली, आणि त्यांचे 32 लाखाचे कर्ज झटक्यात फेडून टाकले. यामुळे समाजात वाहवा मिळाली नसती तरच नवल ! पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता महाराष्ट्राला दिसली.

### एकनाथ शिंदे यांना उचित गौरव

तिसरी महत्त्वाची घटना म्हणजे पुण्यातील सरहद संस्थेच्या वतीने एकनाथ शिंदे यांना प्रतिष्ठेचा ‘महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार’ जाहीर झाला, त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेमध्ये वाढच झाली.

### लोकप्रिय मुख्यमंत्री, नाराज उपमुख्यमंत्री

सव्वादोन महिन्यांपूर्वी म्हणजेच दि. ४ डिसेंबर २०२४ पर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून जनतेसमोर आले. अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या नेत्याला उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले. अशा बदलाचा स्वीकार करणे खूप अवघड असते. हा अनुभव स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यापूर्वी घेतला आहे. त्यांना पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात व सत्ताकारणात जी जबाबदारी दिली ती त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. आता तशीच पाळी एकनाथ शिंदेंवर आली आहे. पण तरी देखील लोकप्रिय मुख्यमंत्री ते काहीसे नाराज उपमुख्यमंत्री असा हा प्रवास सुरू झाला आहे.

### सर्वेसर्वा फडणवीसच..

देवेंद्र फडणवीस हे देशातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचे महाराष्ट्रातील नंबर एक नेते आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा त्यांना भक्कम पाठिंबा आहे. पक्ष संघटना आणि सरकारवर त्यांची पूर्ण पकड आहे. ‘महायुती’ त त्यांचा शब्द अंतिम आहे.

### शिंदेंची लाडकी बहीण

गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत महायुतीला जो जबर फटका बसला त्यानंतर निवडणूक प्रचारात शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून ‘महायुती’ च्या विजयासाठी जे परिश्रम केले, मेहनत घेतली, अहोरात्र अखंड प्रचार केला त्याला तोड नव्हती.

### अतिशय संयमी नेता

मुख्यमंत्रीपद पुन्हा मिळायला हवे होते, अशी इच्छा किंवा महत्वाकांक्षा असणे यात गैर काहीच नाही. राजकारणातील ते अंतिम शिखर असते. त्या शिखरावर बसायला मिळावे, अशी प्रत्येक धडाडीने काम करणाऱ्या नेत्यांची अपेक्षा असते. नव्या सरकारच्या रचनेत मुख्यमंत्रीपद मिळाले नाही, म्हणून शिंदे यांनी आजवर उघडपणे नाराजी व्यक्त केली नाही किंवा थयथयाटही केला नाही.

### वादळे येतील आणि जातीलही

संपूर्ण देशातील वातावरण आत्ता पाहिले तर नरेंद्र मोदी यांची सगळीकडे प्रचंड हवा आहे आणि त्याचा फायदा भारतीय जनता पार्टी नेहमीच उचलणार याचाच अर्थ महाराष्ट्रात सतत देवेंद्र फडणवीस यांची ‘चलती’ राहणार !

पण फडणवीस हे अतिशय चाणाक्ष आणि धूर्त नेते आहेत, त्यामुळे ते एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांना योग्य तो मान आणि योग्य ती प्रतिष्ठा नक्कीच देतील. शिवाय, भाजपाशी पंगा घेण्याचे धाडस कोणीही करणार नाही, तो भाग वेगळा !

## बोधकथा »


### बढाईखोर...

***एक माणूस परेशात गेला आणि शेजाऱ्यांना आपली बढाई सांगू लागला?***

एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले. आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, ‘मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.’ ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, ‘अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला ? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.’ हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे पुष्कळ लोकांना मनातून फार वाटते, पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते. मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे ? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे; ‘तिला सोडून तू ये’ असे त्याला म्हणणे म्हणजे ‘तू येऊ नकोस’ असे म्हणण्यासारखेच आहे;

# मायेच्या तावडीतून सुटण्यास नाम हेच साधन!



कारण एखाद्या इसमाला ‘तू ये, पण तुझी सावली आणू नको’ म्हटले तर कसे शक्य आहे ? म्हणून माया ही राहणारच. आपण तिच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत पोहोचायचे कसे हाच प्रश्न आहे; आणि या प्रश्नाचे उत्तर एकच : भगवंताचे नाम घेणे. नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तीशिवाय सावलीला अस्तित्त्व नाही, तसे मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही. तसेच तिला स्वतंत्र शक्तीही नाही, कारण व्यक्तीच्या हालचालीप्रमाणेच तिची हालचाल होते. व्यक्ती न दिसली तरी तिची सावली जशी दिसते, त्याप्रमाणे मायेचे अस्तित्व मात्र जाणवते. मायेची सत्ता भगवंतावर नाही. एखादा इसम पूर्व दिशेला चालला आहे, तर त्याची सावली त्याच्यामागून त्याच दिशेने जाईल; त्या सावलीच्या मनात जर दिशा बदलून पश्चिमेकडे जाण्याचे आले तर तिला ते शक्य नाही. तो मनुष्यच जर पश्चिमेकडे जाऊ लागला तरच तिला त्या दिशेकडे जाणे शक्य आहे. याचाच अर्थ, माया भगवंताच्या अधीन आहे. सर्व विश्व हे मायारूप आहे; म्हणजे ते परमेश्वराची छाया आहे; याचा अर्थ, या विश्वाला आधार परमेश्वरच आहे.

आता या मायेच्या तावडीतून सुटून परमेश्वराकडे कसे जायचे ? समजा, एखाद्या इसमाला एका मोठ्या व्यक्तीला भेटायचे आहे. पण त्याच्याकडे सरळ जाणे शक्य नाही, कारण त्याच्या घराच्या दारावर रखवालदार, कुत्रे वगैरे आहेत. त्यांच्या तावडीतून सुटून गेले तरच मालकाची भेट होणार. पण समजा, ‘मला अमक्या दिवशी येऊन भेटावे’ अशा मजकूराचे त्या मालकाच्या सहीचे पत्र जर त्याला आले असेल, तर ते पत्र त्या रखवालदाराला दाखविताच तो त्याला बिनतक्रार आता सोडील आणि मालकाची भेट होईल. तसे भगवंताचे नाम, म्हणजे भगवंताच्या सहीचे पत्र, जर आपण घेऊन गेलो तर मायारूपी रखवालदार ती सही पाहून आपल्याला आत सोडील आणि भगवंताची भेट होईल. म्हणून माया तरून जायला भगवंताचे नामस्मरण हाच रामबाण उपाय आहे. नामस्मरणात खूप तल्लीन व्हावे, देहाचा विसर पडावा. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. भगवंत जर कृपण असेल तर तो नामभक्ती देण्यात आहे. म्हणून त्याला आळवावे आणि ‘तुझ्या नामाचे प्रेम दे’ हेच मागावे. बाकी सगळे देईल, पण हे नामप्रेम तो फार क्वचित् देतो. म्हणून आपण तेच मागावे. रामाचे अनुसंधान नित्य ठेवावे आणि आनंदात राहावे.

**बोधवचन:-** विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय; नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या टिकेला प्रत्यूत्तर

# ज्या रंगाचा चष्मा तसे जग : आण्णा हजारे

### दिल्ली विधानसभा निकाल : महाराष्ट्रात राजकीय आरोप-प्रत्यारोपांना आले उधाण

।नवी दिल्ली ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**"दिल्ली विधानसभेचा निकाल हा खोटा पराभव असून तो निकाल मी मानत नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले होते. तसेच दिल्लीत केजरीवालांचा पराभव झाला तेव्हा काहींनी झोपेतून उठून प्रतिक्रिया दिली", असा टोला उद्धव ठाकरेंनी अण्णा हजारेंना नाव न घेता लगावला होता. आता यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "ज्या रंगाचा चष्मा असतो, त्या रंगाचे जग दिसते. चष्माच त्या रंगाचा आहे, त्यामुळे जग दिसणारच तसं, आपण कशाला काय बोलायचं", असे अण्णा हजारेंनी म्हटले.**




दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टीला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. तब्बल २७ वर्षांनी दिल्लीत भाजपला सत्ता मिळाली. दिल्ली विधानसभेतील 70 पैकी 48 जागांवर भाजपने विजय मिळाला. तर 'आप'ला 22 जागांवर समाधान मानावे लागले आहे. त्यामुळे दिल्लीकरांनी भाजपला संधी देत 'आप'ला नाकारल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यावरुन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली. मी अरविंद केजरीवाल यांना सांगितलं होतं पण त्यांनी दारुवर लक्ष केंद्रीत केलं.

त्यांच्या डोक्यात पैशाची, सत्तेची हवा गेली. त्यामुळे त्यांचा पराभव झाला, असे अण्णा हजारे म्हणाले. यानंतर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी अण्णा हजारेंवर टीका केली होती. आता या टीकेला अण्णा हजारे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

आपण कशाला त्यावर बोलायचं?

"पत्रकारांनी मला प्रश्न विचाराला म्हणून मी उत्तर दिलं. नाहीतर मी कधी बोलत नाही. पण सर्व पत्रकारांनी त्याची प्रशंसा केली. एखादा माणूस चुकला असेल तर चुकू द्यायचं. आपण कशाला त्यावर बोलायचं?" असे खोचक उत्तर अण्णा हजारेंनी दिले.

यावर अण्णा हजारेंनी टीका केली. "ज्या रंगाचा चष्मा असतो, त्या रंगाचे जग दिसते. चष्माच त्या रंगाचा आहे, त्यामुळे जग दिसणारच तसं, आपण कशाला काय बोलायचं", असे अण्णा हजारेंनी म्हटले.

#### अण्णा हजारे यांची भूमिका संशयास्पद

"अण्णा हजारे यांना महात्मा करण्याचे काम अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांनी केले. अण्णा हजारे यांनी दिल्ली कधी पाहिली असती? रामलीला मैदान, जंतर-मंतर रोड कधी पाहिला असता? त्यावेळी आंदोलनाला जो काही आवाका दिला त्यानंतर ते देशाला माहिती झाले, नाही तर ते राळेगणचे दैवत होते. महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे इतके स्फोट झाले. मोदी सरकार असो किंवा शिंदे-फडणवीसांचे सरकार असेल, त्यावेळी अण्णांनी राळेगणमध्ये कूसही बदलली नाही, हे दुर्दैवाने सांगायला लागत आहेत. भ्रष्ट सरकारच्या बाजूने ते उभे राहिले. अण्णा हजारे यांची भूमिका संशयास्पद आहे", अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली होती.

## केंद्रीय कोट्यातून पुन्हा केंद्रीय दाखला काढण्याची प्रक्रिया

### विद्यार्थी-पालक संभ्रमात : 'नीट'साठी आता विद्याथ्तीर्थ्यांमध्ये जातीच्या दाखल्यांचा गोंधळ

।सांगली।महाईन्यूज।

**यंदाच्या नीट परीक्षेसाठी अर्ज करताना नॅशनल टेस्टिंग एजन्सीने इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना केंद्रीय जातीचा दाखला आवश्यक केला आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे हा दाखला नसेल त्यांना संबंधित विभागाकडे अर्ज करून त्या अर्जाची पोचपावती अर्जासोबत सादर करायची आहे. मात्र, केंद्रीय दाखल्याची मुदत एक वर्षाची असल्याने सर्व विद्यार्थ्यांना केंद्रीय कोट्यातून प्रवेशावेळी पुन्हा केंद्रीय दाखला काढावा लागणार आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थी गोंधळले आहेत.**




नीटसाठी अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ११ मार्चपर्यंत अर्जाची मुदत आहे. या काळात काढलेल्या केंद्रीय जातीच्या दाखल्याची मुदत ३१ मार्च २०२५पर्यंतच असेल. मात्र, केंद्रीय कोट्यातून वैद्यकीय प्रवेश घेताना १ एप्रिल २०२५ नंतरचाच दाखला सादर करावा लागणार आहे. त्यामुळे नीटच्या अर्जासाठी यावर्षी काढलेल्या केंद्रीय दाखल्याचा उपयोग ऑल इंडिया कोटासाठीच्या वैद्यकीय प्रवेशासाठी होणार नाही. प्रवेश अर्जासोबत केंद्रीय दाखला आवश्यक करण्याचे एनटीएचे प्रयोजन काय? असा सवाल विद्यार्थी व पालकांकडून उपस्थित होत आहे.

#### एजन्सीकडून पूर्वसूचना नाही

आधारकार्ड अपडेट करण्याविषयी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने पूर्व नोटीस काढली होती. मात्र, केंद्रीय दाखल्यासंबंधी कोणतीही पूर्वसूचना एजन्सीने दिलेली नाही. असे असताना ऐनवेळेस हा दाखला आवश्यक केल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे.

सध्या देशभरात बारावीची परीक्षा सुरू असल्याने केंद्रीय जातीचा दाखला मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा वाया जाणार आहे. या दाखल्याचा उपयोग परीक्षेपुरता अर्ज करण्यासाठी होणार आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी नव्याने पुन्हा दाखला काढावा लागेल. त्यामुळे गतवर्षीप्रमाणे राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने केंद्रीय जातीच्या दाखल्याऐवजी सेल्फ डिक्लरेशन फॉर्म अपलोड करण्याची संधी देण्याची आवश्यकता आहे, असे - वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया सल्लागार, डॉ. परवेज नाईकवाडे यांनी सांगितले.

#### यापूर्वीची पद्धत काय होती?

अर्ज करताना दाखला नसेल तर वैद्यकीय प्रवेश घेताना सदर दाखला हजर करू, असे प्रतिज्ञापत्र अपलोड करण्याची संधी गतवर्षी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली होती. यंदाही तशी संधी देण्याची आवश्यकता होती.

### फ्रान्स- पॅरिसच्या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण

# शाश्वत विकासासाठी AI चा उपयोग : पंतप्रधान

## ‘एआय’न घाबरता त्याच्या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे : मोदी

। पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**एआयची जागतिक परिषद फ्रान्सच्या पॅरीस येथे भरली आहे. या एआय परिषदेत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषण केले आहे. आर्टीफिशियल तंत्रज्ञानाचा वेगाने विकास होत आहे. या तंत्रज्ञानामुळे धोके जरी वाढले असले तरी त्याचा उपयोग शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान आणि इतर मानवी कामांसाठी करणे गरजेचे आहे. एआयमुळे नोकऱ्या जातील ही मोठी भीती व्यक्त होत आहे. परंतू प्रत्येक नवीन तंत्रज्ञान आले तेव्हा अशीच भीती व्यक्त केली गेली. परंतू नवीन तांत्रिक नोकऱ्या उपलब्ध होतच गेल्या त्यामुळे एआय तंत्रज्ञानाला न घाबरता त्याचा उपयोग दैनंदिन गरजांसाठी करणे गरजेचे आहे. खास करुन शाश्वत विकासासाठी त्याचा उपयोग आपल्याला करता आला पाहिजे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत संबोधताना म्हटले आहे.**




पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (AI) विकास वेगाने होत आहे.

भारत या क्षेत्रातील आपला अनुभव आणि विशेषत: शेअरिंग करण्यासाठी तयार आहे हे म्हणजे एआयचे भविष्य सर्वासाठी चांगले होईल. आम्ही सार्वजनिक भल्यासाठी एआय एप्लीकेशन विकसित करीत आहोत. भारताने आपल्या १.४ अब्ज लोकसंख्येसाठी एकदम कमी भांडवलात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेला यशस्वीपणे तयार केले आहे. आम्हाला एआय संदर्भातील मुद्द्यांचा निपटारा करण्यासाठी जागतिक मानकांची गरज आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिका दौऱ्या आहेत. डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे. ट्रम्प टैरिफची भीती या दौऱ्यात आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय धक्कादायक ठरणार आहे.

स्टील आणि एल्युमीनियम आयातीलवर 25 टक्के आयात शुल्क लावण्याची ट्रम्प यांची योजनेमुळे भारताचे 87,47,44,00,000 रुपयांचे नुकसान (एक अब्ज डॉलर) होणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी डोनाल्ड ट्रम्प यांना हा निर्णय घेण्यापासून परावृत्त करु शकणार का? हा मोठा प्रश्न आहे.

### नोकऱ्या जातील ही भीती निराधार!

एआयने सायबर गुन्हेगारी संदर्भातील धोके निर्माण झाले आहेत. तसेच फेक न्यूज आणि इतरही धोके दिसत आहेत. सायबर सिक्युरिटी, डीपफेक असे धोके आहेतच त्यासाठी एक निती ठरविण्याची गरज आहे. एआयने नोकऱ्या जातील ही सर्वात मोठी भीती आहे. परंतू इतिहास याला साक्षी आहे जेव्हा कोणतेही तंत्रज्ञान येते तेव्हा नोकऱ्या जात नाहीत उलट कामाचे स्वरुप बदलते आणि नव्या पद्धतीचे जॉब आपोआप तयार होतात असेही पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.

---

# थायलंड देशामध्ये आता हत्तींसाठी कुटुंब नियोजन!

## सरकारचा प्रस्ताव : देशात मानव-हत्तींमधील संघर्ष; 8 टक्के दराने हत्तींची संख्या वाढली

। ऑनलाईन डेस्क ।महाईन्यूज।

**मानव-हत्तींमधील संघर्ष वाढल्याने थायलंडने मोठा निर्णय घेतला आहे. थायलंड सरकारने काही प्रमाणात वन्य मादी हत्तींसाठा कुटंब नियोजनाचा प्रस्ताव मांडला आहे.**



१९८६ पासून आशियाई हत्तींना धोक्यात असलेल्या प्रजाती म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. परंतु थाई अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की संवर्धन प्रयत्नांमुळे देशात हत्तींची संख्या दरवर्षी ८% दराने वाढत आहे. यामुळे जंगलांमध्ये त्यांचं प्रमाण वाढलं आहे. परिणामी हत्ती लोकवस्तीत शिरून माणसांना त्रास देतात. त्यांच्या शेती आणि घरांचं नुकसान करत असून यामुळे मानवी मृत्यूही वाढले आहेत.

### हत्तींच्या शरीरावर काय परिणाम होणार?

मादी हत्तींना लक्ष्य करून घेतलेला स्पायव्हॅक लसीकरण सात वर्षांपर्यंत गर्भनिरोधक परिणाम देते. हे लसीकरण हत्तींच्या वर्तनात किंवा शारीरिक वैशिष्ट्यांमध्ये बदल करत नाही, तर फक्त त्यांच्या संप्रेरक पातळीचे नियमन करते जेणेकरून त्यांना गर्भधारणा होऊ नये. एप्रिलमध्ये सात मादी हत्तींवर हे लसीकरण प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले आणि त्याचे कोणतेही दुष्परिणाम झाले नाहीत, असे त्यांनी सांगितले. “हा उपक्रम जंगली हत्तींचे संवर्धन करताना वनजमिनीजवळ राहणाऱ्या शेकडो लोकांना सुरक्षित ठेवण्यास मदत करू शकतो”, असे अट्टापोल म्हणाले.

मंत्री चालेरमचाई श्री-ऑन म्हणाले की, राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव आणि वनस्पती संवर्धन विभाग (DNP) आणि संबंधित क्षेत्रांना वन्य हत्तींची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपक्रमाचा एक भाग म्हणून हा उपाय अवलंबण्याचे आदेश दिले आहेत. थायलंडमध्ये किमान ४ हजार वन्य हत्ती आहेत, ज्यांचा जन्मदर दरवर्षी ७-८% ने वाढत आहे. पुढील चार वर्षांत वन्य हत्तींची संख्या किमान ६ हजारपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. वनक्षेत्र कमी होत असताना हत्तींची संख्या वाढल्याने मानवी संघर्ष अधिक वाढण्याची शक्यता आहे.

# शाहिदच्या 'चूप चूप के'च्या मागील स्टोरी..!

बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूरची आजही प्रेक्षकांमध्ये एक वेगळीच क्रेझ आहे. त्यापैकी एक चित्रपट म्हणजे 'चुप चुप के'. शाहिदच्या या चित्रपटातील भूमिकेनं सगळ्यांना वेड लावलं. त्या चित्रपटात शाहिद या चित्रपटात मुक असल्याचं नाटक करत असल्याचे दाखवण्यात आले. आता तुम्ही विचार करत असाल की हा चित्रपट ओरिजनल नाही यावर तुमचा विश्वास नसेल. पण खरंतर हा चित्रपट रिमेक आहे. हा चित्रपट कोणत्या भाषेतून घेण्यात आला आहे आणि त्याचं नाव काय आज आपण हे सगळं जाणून घेऊया...

खरंतर, शाहिद कपूरचा 'चुप चुप के' हा चित्रपट 'पंजाबी हाऊसचा रिमेक आहे. आता तुम्हाला नाव वाचून असं वाटत असेल की हा एक पंजाबी चित्रपट आहे. तर असं नसून हा एक मल्याळम चित्रपट आहे. 'पंजाबी हाऊस' हा चित्रपट 1998 मध्ये प्रदर्शित झाला होता. या कॉमेडी, ड्रामा चित्रपटानं सगळ्यांचे लक्ष वेधले होते. रफी - मेकार्टिन या पटकथा लेखक आणि दिग्दर्शकानं मिळून हा चित्रपट बनवला होता. या चित्रपटाची पटकथा लिहिण्यासाठी रफी - मेकार्टिन यांना जवळपास 1 वर्ष लागलं. खरंतर, या चित्रपटाची पटकथा ही त्यांना आलेल्या एका अनुभवावर आधारीत आहे. त्यांना ट्रेननं प्रवास करत असताना हा अनुभव आला होता. त्यावरून त्यांनी याच विषयावर चित्रपट करण्याचा निर्णय घेतला.

## नेमकी पटकथा कशी सुचली?

रफी आणि मेकार्टिन हे दोघं रेल्वेनं प्रवास करत असताना त्यांनी सकाळी नाश्त्यासाठी काही घेतलं. त्यानंतर त्यांना जाणवलं की ते जेवण हे खराब झालं आहे आणि त्याच्या दुसऱ्याच क्षणी त्यांनी ते बाहेर टाकून दिलं. त्यांनी काही तरी खायचं फेकलंय हे पाहून शाळेच्या गणवेशात असलेला मुलगा ते उचलण्यासाठी धावला. आता जेवण खराब आहे हे माहित असल्यामुळे रफी आणि मेकार्टिन या दोघांनी त्याला ते घेऊ नको असा सल्ला दिला. या सगळ्या परिस्थितीतून पळून जाण्यासाठी त्या मुलानं मुक असल्याचं नाटक करत ते जेवण घेऊन तिथून पळून जाणं पसंत केलं. हे पाहता रफी आणि मेकार्टिन यांनी अभिनेता मोहनलाल यांना डोक्यात ठेवून विचार केला होता. त्यांनी केलेल्या विचारानुसार सुपरमार्केटमध्ये काम करणाऱ्या एका महिलेला जी तिथे मुकबधिर असल्याचं नाटक करते तिला एक पुरूष आकर्षित करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी ही फक्त एक छोटी कथा होती.

# लकी अली आता लग्न करणार म्हणतो..!



लोकप्रिय गायक लकी अलीची गाणी आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. त्यासोबत लकी अलीचं खासगी आयुष्या देखील तितकंच चर्चेत असतं. लकी अलीनं आता चौथ्यांदा लग्न करण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे. लकी अलीनं नुकतीच दिल्लीच्या सुंदर नर्सरीमध्ये झालेल्या 18 व्या कथाकार इंटरनॅशनल स्टोरीटेलर फेस्टिवलमध्ये सहभागी झाला होता. इतकंच नाही तर चौथ्यांदा लग्न करण्यावारून देखील त्यानं वक्तव्य केलं. त्याचीच सध्या सगळीकडे चर्चा सुरु आहे.

लकी अलीनं फक्त त्याच्या परफॉर्मेसमध्ये सगळ्यांची मने जिंकली. इतकंच नाही तर काही हिट गाणी देखील गायली आणि त्या मागचे मजेशीर किस्से देखील सांगितलं. या दरम्यान, जेव्हा लकी अलीला त्याच्या स्वप्नांविषयी विचारण्यात आलं तर त्यानं दिलेल्या उत्तरानं सगळ्यांना आश्चर्य झालं. लकी अलीनं सांगितलं की माझं स्वप्न हे आहे की मी पुन्हा एकदा लग्न करावं.

लकी अलीनं केलेल्या या वक्तव्यानंतर तो चौथ्यांदा लग्न करणार अशी चर्चा सुरु झाली आहे. लकी अलीनं पहिल्यांदा 1996 मध्ये लग्न केलं. त्याच्या पहिल्या पत्नीचं नाव मेगन जेन मेकलरी असं होतं. मेगन ही ऑस्ट्रेलियाची राहणारी होती. मेगन आणि लकी अलीला दोन मुलं आहेत. दोघांची भेट ही लकी अलीच्या एल्बम 'सुनो' च्या दरम्यान, झाली होती आणि मग त्यांनी लग्न केलं. लग्नाच्या काही काळानंतर ते विभक्त झाले. लकी अलीनं 2000 मध्ये एका पारसी महिला अनाहिताशी दुसरं लग्न केलं. लकी अलीनं अनाहिताशशी दुसरं लग्न केलं. तर या लग्नासाठी अनाहितानं लकी अलीशी लग्न करण्यासाठी इस्लाम धर्म स्वीकारला आणि नाव बदलत इनाया ठेवलं. या लग्नातून लकी अलीला आणखी दोन मुलं झाली. त्यानंतर 2010 मध्ये लकी अलीनं केट एलिजाबेथ हलमशी लग्न केलं. पण 2017 मध्ये घटस्फोट झाला. त्यानंतर एलिजाबेथनं देखील लग्नानंतर स्वत: चं नाव आयशा अली ठेवलं. एलिजाबेथ ही लकी अली पेक्षा वयानं 24 वर्ष लहान होती. त्यांना एक मुलगा देखील आहे. अशात आता लकी अलीनं चौथ्यांदा लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# कौतुक करताना मनोज थांबेना!

**मुंबई:** 'राम तेरी गंगा मैली' सिनेमाची आजही चर्चा होत असते. या चित्रपटातून अभिनेत्री मंदाकिनी लोकप्रिय झाल्या. सिनेमातल्या बोल्ड सीनमुळं मंदाकिनी यांनी खळबळ उडवून दिली होती.बोलके डोळे, देखणं रुप यामुळं आजही त्यांची क्रेझ आहे.एका सिनेमामुळं मंदाकिनी स्टार झाल्या होत्या. मंदाकिनी यांना सिनेमात घेण्यासाठी त्यांच्या घराबाहेर निर्मात्यांची रांग लागायची. मंदाकिनी यांनी नुकतीच इंडियाज बेस्ट डान्सर या रिॲलिटी शोमध्ये हजेरी लावली होती. या शोमध्ये होस्ट हर्ष लिंबाचियानं मंदाकिनी यांना एक प्रश्न विचारला.त्याच्या या प्रश्नामुळं बॉलिवूडमध्ये ८० च्या दशकातून झालेला बदल प्रेक्षकांना समजला. आज बॉलिवूडमध्ये कलाकरांना सगळ्या सुखसोई दिल्या जातात. काही कलाकारांसाठीतर एक नव्हे तर चार चार व्हॅनिटी व्हॅन उपलब्ध असतात. पण एक काळ असाही होता की, अभिनेत्रींना त्यांची मेकअप रुमही मिळत नव्हती.

# 'ब्युटी विथ ब्रेन' ती हिच!

**मुंबई:** बॉलिवूडमध्ये अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्या त्यांच्या सौंदर्याने आणि अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालतात. पण काही मोजक्याच अशा असतात ज्या फक्त लूक आणि टॅलेंटपुरत्या मर्यादित नसतात, तर त्या बुद्धिमत्तेनेही सगळ्यांना अचंबित करतात! अभिनयाच्या दुनियेत यश मिळवण्याआधीच या अभिनेत्रीने एक भन्नाट IPHONE ॲप तयार केलं होतं, ज्यामुळे ती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही चमकली. त्या काळात अशा प्रकारचं ॲप तयार करणं म्हणजे मोठी गोष्ट होती.

बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यापूर्वी तापसी पन्नू ही एक हुशार संगणक अभियांत्रिकी विद्यार्थिनी होती. आपल्या शेवटच्या वर्षात असताना तिने "FONTSWAP" नावाचं एक ॲप डिझाइन केलं होतं. हे ॲप IPHONE युजर्सना त्यांच्या फोनमधील फॉन्ट्स बदलण्याची सुविधा देत होतं. त्या काळात अशा सुविधा फार कमी उपलब्ध होत्या, त्यामुळे FONTSWAP हे खूपच नाविन्यपूर्ण ॲप ठरलं. दुर्दैवाने, APPLE APP STORE मधील कठीण मंजुरी प्रक्रियेमुळे हे ॲप अधिकृतरित्या लाँच होऊ शकलं नाही.

पण तापसीच्या तंत्रज्ञानातील कौशल्याचा हा एक उत्तम नमुना ठरला. तापसी ही केवळ यशस्वी अभिनेत्रीच नव्हे, तर अभ्यासातही ती आघाडीवर होती. तिने तिचं शालेय शिक्षण माता जय कौर पब्लिक स्कूल, दिल्ली येथे पूर्ण केलं आणि नंतर गुरु तेग बहादूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून संगणक अभियांत्रिकी पदवी घेतली. इतकंच नाही, तर तिने CAT (COMMON ADMISSION TEST) मध्ये 88% गुण मिळवत प्रतिष्ठित व्यवस्थापन संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्याची पात्रता देखील मिळवली. मात्र, तिच्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळाली.



# वादानंतर युट्यूबची कारवाई, रणवीर अलाहाबादियाचा तो व्हिडिओ हटवला!



: 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमध्ये आई-वडिलांविषयी केलेल्या अश्लील विधानामुळं यूट्यूबर आणि 'बीअरबायसेप्स' अशी ओळख असलेल्या रणवीर अलाहाबादिया याच्यावर सर्व स्तरांतून टीका होत आहे. मुंबई पोलिसांकडे यासंदर्भात तक्रारही करण्यात आली आहे. या सगळ्या वादानंतर युट्यूबनं आता मोठं पाऊल उचललं हे. अश्लील आणि आक्षेपार्ह विधानांमुळं चर्चेत असलेला हा व्हिडिओ आता युट्यूबनं काढून टाकला आहे. या प्रकरणात माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दखल घेत यासंदर्भात युट्यूबला नोटीस पाठवली होती. तर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानूनगो यांनी देखील व्हिडिओ डिलिट करण्याची मागणी केली होती. यानंतर युट्यूबनं हा व्हिडिओ काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

काय हे नेमकं प्रकरण?

'इंडियाज गॉट लेटेंट' हा यूट्युबवरील विनोदी रिॲलिटी शो त्यात बेधडक वापरल्या जाणाऱ्या अश्लील आणि आक्षेपार्ह विधानांमुळं तरुण पिढीमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. यात स्पर्धकांना आमंत्रित करून वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींना परीक्षक म्हणून बोलावण्यात येतं. एका भागामध्ये यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया आणि अपूर्वा मखीजा यांना बोलावण्यात आलं होतं. या शोमध्ये सहभागी झालेल्या एका स्पर्धकाला रणवीरनं आई -वडिलांविषयी अतिशय अश्लील प्रश्न विचारला. ही वादग्रस्त क्लिप लेखक-कथाकार नीलेश मिश्रा यांनी त्यांच्या 'एक्स' पेजवर शेअर केली. त्यासोबत त्यांनी असे लिहिलं होते, 'आपल्या देशाच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलणाऱ्या विकृत निर्मात्यांना भेटा.' ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर रणवीरवर टीकेचा भडिमार करण्यात आला.

## शिरीष महाराज मोरे यांच्या कुटुंबाला 32 लाखांची मदत

# कुंडलच्या कुस्ती मैदानात मच्छवाडाची बाजी!

### प्रिन्स कोहलीने माऊली जमदाडेवरती घिस्सा डावावर विजय मिळवला

। सांगली । महाईन्यूज। प्रतिनिधी

**कुंडल (ता. पलूस) येथील महाराष्ट्र कुस्ती मैदानात प्रथम क्रमांकाच्या लढतीत पंजाबच्या गौरव मच्छवाडा याने महाराष्ट्र केसरी हर्षल सदगिर याला हफ्ता डावावर चितपट करत विजय मिळवला. दोन्ही पैलवानांच्यात बराच वेळ खडाखडी सुरू होती. ११ व्या मिनटाला गौरवने कुस्ती जिंकली.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महाराष्ट्र कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते.**



माऊली जमदाडे विरुद्ध प्रिन्स कोहली यांच्यात झालेल्या कुस्तीत चौथ्या मिनिटाला प्रिन्स कोहलीने माऊलीवरती घिस्सा डावावर विजय मिळवला. महेंद्र गायकवाड विरुद्ध प्रकाश बनकर यांच्यात झालेल्या कुस्तीत महेंद्र गायकवाड पुट्टी डावावरती दहाव्या मिनिटाला विजयी झाला.

दादा शेळके विरुद्ध लल्लू जम्मू यांच्यातील कुस्ती ३० मिनिटांनी गुणावर लावण्यात आली. दादा शेळके आक्रमक झाला आणि दुसऱ्या मिनिटाला तो गुणांवरती विजयी झाला.

यासह, इतर चटकदार कुस्त्यांत रविराज चव्हाण विरुद्ध अभिनव नायक यांच्यातील कुस्ती प्रेक्षणीय झाली. प्रथम अभिनवने छडी टांग करत कुस्तीत रंगत आणली. हा डाव पलटवार करत एकेरी कसावरती चौथ्या मिनिटानंतर रविराज चव्हाणने कुस्ती जिंकली आणि प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. या वर्षी मैदानात निकाली महिला कुस्त्याही झाल्या.

नेहा शर्मा विरुद्ध धनश्री फंड यांच्यात कुस्ती झाली. सुरुवातीला नेहाने मोळी बांधण्याचा प्रयत्न केला; पण आठ मिनिटांच्या खडाखडीनंतर कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली. मुस्कान रोहतक विरुद्ध पूजा लोंढे यांच्यात कुस्ती झाली. यामध्ये एकेरी कसावरती अवघ्या दुसऱ्या मिनिटाला मुस्कान रोहतक विजयी झाली. वेदान्तिका पवार विरुद्ध दिशा मलिक यांच्यात कुस्ती झाली; पण ती बरोबरीत सोडवण्यात आली. वैष्णवी पवार विरुद्ध रिया भोसले यांच्यात झालेल्या कुस्तीमध्ये भोसलेने पोकळ घिस्सा डावावर विजय मिळवला.

दरम्यान, या वेळी खा. विशाल पाटील, आ. विश्वजित कदम, आ. अरुण लाड, क्रांती कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड, माजी खासदार संजयकाका पाटील आदी उपस्थित होते. या वेळी आजी-माजी खासदारांमध्ये गप्पांची मैफल चांगलीच रंगली होती.

---

## कप्तान चला सीना तान! मुंबईसाठी ठरला संकटमोचक

### रणजी ट्रॉफी: उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात कर्णधार अजिंक्य रहाणेचे दमदार शतक

। मुंबई । महाईन्यूज। प्रतिनिधी

**रणजी ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने दमदार शतकी खेळी केली आहे. मुंबई आणि हरियाणामध्ये कोलकाता येथील ईडन गार्डन मैदानावर हा सामना सुरू आहे. सामन्याच्या चौथ्या दिवशी दुसऱ्या डावामध्ये शतकी खेळी करत रहाणेने ३०० चा टप्पा पार करून दिला. अजिंक्य रहाणेची १०८ धावांची खेळी हरियाणासमोर आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यामध्ये महत्त्वाची ठरली. मुंबईने दुसऱ्या डावामध्ये ३३९ धावा केल्या असून हरियाणाला जिंकण्यासाठी ३५४ धावांची गरज आहे.**



अजिंक्य रहाणे याचा २०० वा प्रथम श्रेणी सामना असून त्याने या सामन्यात शतक ठोकलं आहे. अजिंक्य रहाणेने ४१ प्रथम श्रेणी शतके केली असून त्यामध्ये १२ कसोटी शतकांचा समावेश आहे. यंदाच्या ट्रॉफीमधील रहाणेचे हे पहिलेच शतक आहे. मात्र महत्त्वाच्या सामन्यामध्ये त्याने ही शतकी खेळी केली आहे. सूर्यकुमार यादवसोबत भागीदारी करत रहाणेने डाव सावरला. अजिंक्य रहाणे आणि सूर्यकुमार यादवला वगळता इतर कोणत्याही खेळाडूला मोठी खेळी करता आली नाही.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सूर्यकुमार यादव आणि अजिंक्य रहाणे यांनी १२९ धावांची भागीदारी केली. सूर्यकुमार ७० धावांवर आऊट झाला होता. त्यानंतर शिवम दुबेने ४८ धावा केल्या होत्या. अजिंक्यने यंदाच्या मोसमातील पहिले शतक केले असून त्याने १२ डावांमध्ये ४३७ धावा केल्या आहेत. यामध्ये दोन अर्धशतक आणि एका शतकाचा समावेश आहे. गेल्या काही दिवसांपासून रहाणे घरगुती क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करत आहे. त्यामुळे निवड समितीचं त्याच्याकडे लक्ष जातं की नाही हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. जुलै २०२३ पासून अजिंक्य राष्ट्रीय संघातून बाहेर आहे.

दरम्यान, सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेमध्ये त्याने सर्वांचं लक्ष वेधलं होतं. अजिंक्यने ५८.६२ सरासरीने ४६९ धावा केल्या होत्या. रहाणेने गेल्या वर्षी आयपीएलमध्ये धमाकेदार अंदाजात खेळी करत कसोटी टीममध्ये जागा मिळवली होती. तर यंदा तो कोलकाता नाईट रायडर्स टीमकडून खेळणार आहे.


## कुदळवाडीमध्ये सलग अतिक्रमण कारवाईचा धडाका

# 41 लाख चौरस फूट बांधकाम निष्कासित!

### 757 मालमत्तांची जप्ती: महानगरपालिका कर संकलन विभागाची आक्रमक भूमिका

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**चिखली येथील कुदळवाडी भागात ९६ एकर भूभागावरील सुमारे ४१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८०६ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सलग चौथ्या दिवशी सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांचा समावेश होता.**



शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि धडक कारवाई पथकांमार्फत कुदळवाडी येथे ८ फेब्रुवारी २०२५ पासून अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई करण्यात येत असून आज कारवाईचा चौथा दिवस होता.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, महेश वाघमोडे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या कारवाईमध्ये सहभागी यंत्रणा**

अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या आहेत. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

### 2 हजार 317 बांधकामांवर कारवाई

आज अखेरपर्यंत सुमारे २ हजार ३१७ बांधकामांवर करण्यात आली निष्कासनाची कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या वतीने कुदळवाडी येथे सुरू असलेल्या या निष्कासनाच्या कारवाईमध्ये आज अखेरपर्यंत सुमारे १६१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या एकूण २ हजार ३१७ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सुमारे ३७२ एकर भूभागावर ही कारवाई करण्यात आली असून यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे.

---

## शहरतात अनधिकृत खासगी 24 आरओ महापालिकेची कारवाई!

### महापालिका प्रशासनाची माहिती: पाण्याचे आतापर्यंत 5 हजार 905 नमुने तपासले

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज। प्रतिनिधी

**गिलियन बेरे सिंड्रोमचा (GBS) प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. महानगरपालिकेने आतापर्यंत शहरातील २४ अनधिकृत खासगी आरओ प्लांट्सवर कारवाई केली आहे. तसेच २७ वॉटर एटीएमवर देखील कारवाई करून ते बंद करण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.**



शहरात असणाऱ्या ६ विहिरीसह आतापर्यंत विविध ठिकाणचे एकूण ५ हजार ९०५ पाण्याचे नमुने तपासण्यात आले असल्याचेही ते म्हणाले. महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त अण्णा बोदडे, शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते.

गिलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासण्यात येत आहेत. महानगरपालिकेच्या वतीने वॉटर एटीएम आणि खासगी आरओ प्लांट्सची देखील तपासणी करण्यात येत आहे.

**प्रभागनिहाय करण्यात आली कारवाई**

पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर यांच्यामार्फत क्षेत्रीय कार्यालयनिहाय या प्लांट्सची तपासणी केली जात आहे. यामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय २ आरओ प्लांट तर ७ एटीएम आरओ प्लांट, ब क्षेत्रीय कार्यालय १, ग क्षेत्रीय कार्यालय ४ आणि ह क्षेत्रीय कार्यालय १ आरओ प्लांटचा समावेश आहे. आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. गिलियन बॅरे सिंड्रोमच्या (GBS) पार्श्वभूमीवर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे. पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतला जाईल, असे पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

### आयुक्त शेखर सिंह यांची माहिती



दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे अनधिकृत वॉटर एटीएम आणि आरओ प्लांट्स आढळताच त्यावर तात्काळ कारवाई केली जात आहे. त्यानुसार आतापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील २४ आरओ व २७ वॉटर एटीएम प्लांट्सवर कारवाई केली आहे, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 42 | 55+ | 11+ | 17k+ | 600+ | 13k+ |
| YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION | NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS | CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA | 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES | TEACHING AND NON TEACHING STAFF | 13,000 ALUMNI ACROSS GLOBE |

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org

# देशातील पहिला डिजिटल हत्ती पाहिला का?

। पुणे । महाईन्यूज। प्रतिनिधी

**भला मोठा डिजिटल हत्ती, महाकाय अस्वल अन् मृत्युगोलात मोटार सायकलवर चित्तथरारक कसरती, व्हील ऑफ डेथ, फ्लायिंग ट्रपिझ, स्वॉर्ड बॅलन्स, जग्लिंग, इ-स्केटिंग, वॉटर शो, इ-स्कीप्पिंग जंप असे खेळ पाहण्याची संधी पुणेकरांना मिळत आहे. रॅम्बो सर्कस पुण्यात आली असून, तिथे बच्चे कंपनीसाठी खास मनोरंजनाची मेजवानी पहायला मिळत आहे.**



आपल्या देशात सर्कसमध्ये प्राण्यांचा खेळ करण्यास तसेच प्राणी पाळण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे सर्कशीमधून प्राणी हद्दपार झाले. बच्चे कंपनीला आवडणारे प्राणी आता आपल्या देशात कोणत्याच सर्कसमध्ये नाहीत. त्यामुळे रॅम्बो सर्कस मधील वाघ, सिंह, हत्ती, अस्वल, हिप्पोपोटोमस, चिंपांझी, उंट, घोडे, असे सारे प्राणी सरकारकडे जमा झाले. त्यावेळेस रॅम्बो सर्कसचे मालक सुजित दिलीप यांनी केरळमधील कोईमतूर येथून ६ महिने खपून हुबेहूब डिजिटल हत्ती तयार केला.

सुमारे ७-८ फूट उंचीचा हा 'डिजिटल हत्ती' चाकांवर ठेवला आहे. हत्तीच्या पाठीवर बसलेला सर्कस कलावंत तांत्रिकदृष्ट्या ऑपरेटिंग करतो व त्यानुसार हा डिजिटल हत्ती डावीकडे उजवीकडे मान वळून बघतो व सोंड उंच करून पाण्यचा फवारा मारतो. तसेच हा डिजिटल हत्ती चित्कारतो देखील ! या सोबतच कापडी चिंपांझी, जिराफ आणि झेब्रादेखील सर्कसमध्ये आहेत. हे आर्टिफिशियल प्राणी बच्चेकंपनीचे मनोरंजन करत आहेत. ही सर्कस सिंहगड रोड येथे फनटाईम थिएटरच्यामागील मैदानात साकारली आहे.

"येत्या काही महिनात मोठा कापडी चिंपांझी दुबईहून आणि उड्या मारणारा मोठा कापडी कांगारू ऑस्ट्रेलियामधून रॅम्बो सर्कसमध्ये देखील होईल. देशातील पहिले डिजिटल हत्ती सर्कसमध्ये पहिल्यांदा आणण्याचा मान रॅम्बो सर्कसला मिळाला याचा आनंद होतो. पुणेकरांनी देखील या डिजिटल हत्तीला मोठा प्रतिसाद दिला, असे रॅम्बो सर्कसचे सुजित दिलीप म्हणाले.